युवा फ्रेडरिक डगलस

स्वातंत्र्य सेनानी

एंड्र्यू वुड्स, चित्र : एलन




मराठी : अश्विनी बर्वे



फ्रेडरिक एक गुलाम म्हणून जन्माला आले होते. पण नंतर ते एक महान नेते झाले ज्यांनी आफ्रिकी-अमेरिकेच्या अधिकारांसाठी लढाई केली.

फ्रेडरिक बेलीचा जन्म १८१७ मध्ये मैरीलँडमध्ये झाला होता. त्यांची आई एक गुलाम होती.मालकाने त्यांना आपल्या बरोबर मुलाचे पालन करू दिले नाही. म्हणून फ्रेड आपल्या आजी-आजोबांबरोबर बेट्सी आणि इसहाकं बेली बरोबर राहिला आणि वाढला.





फ्रेड खुश होता. त्याला आपल्या चुलत भावांबरोबर खेळायला, आपल्या आजीला मदत करायला आणि नदीत मासे पकडायला मजा येत असे.



कारण तो एक गुलाम होता, म्हणून फ्रेडला दरवर्षी गुडघ्यापर्यंत येणारे दोन शर्ट केवळ मिळत. हाच सदरा त्याला थंडीत आणि उन्हाळ्यात घालावा लागत असे.

जेव्हा फ्रेड ७ वर्षाचा झाला,तेव्हा त्याची आजी त्याला आपला मालक कॅप्टन एथनीच्या मळ्यात घेवून गेली. आजीला त्याला सोडण्याची इच्छा नव्हती, पण तिच्याजवळ काही पर्याय नव्हता. फ्रेड घाबरलेला आणि एकटा होता.



कॅप्टन एंथनीच्या शेतात फ्रेडने, गाई धुण्यासाठी आणायला मदत केली. त्याने गोठ्याची सफाई केली आणि कॅप्टन एंथोनीची छोटी छोटी कामं केली.काम खूप कठीण नसे, पण फ्रेड नेहमी थकलेला आणि भुकेला असे.





गुलामांना सूर्योदयाच्या आधी उठावे लागे आणि अंधार होईपर्यंत ते आपलं काम बंद करू शकत नसत. नाष्ट्यासाठी मुलं एका मोठ्या पातेल्यात मक्याचा दलिया खात. रात्रीच्या जेवणात त्यांनी नेहमी मक्याच्या पोळीचा एक तुकडा मिळत असे.



एका रात्री, सैपाक्याने फ्रेडला रात्री खायला दिले नाही. फ्रेड स्वयंपाकघराच्या बाहेर बसून राहिला. भुकेमुले त्याला झोप येत नव्हती. अचानक त्याच्याजवळ एकजण आलं- त्याची आई! आई त्याला भेटण्यासाठी १५ मैल दूरच्या एका शेतावरून रात्री चालत आली होती.




आई ने फ्रेडला उठवलं आणि त्याला खाण्यासाठी एक जिंजर केक दिला. आईने सैपाक्याला फ्रेडशी नीट वागायला सांगितलं. तेव्हा फ्रेडला कळलं की त्याची आई त्याच्यावर खूप प्रेम करत होती आणि नेहमी त्याच्याबद्दलच विचार करत होती.

जेव्हा फ्रेड ८ वर्षाचा झाला तेव्हा त्याला कॅप्टन एंथोनी यांच्या नातेवाईकांकडे काम करण्यासाठी बाल्टीमोरला पाठवले. त्यांचे नाव होते सोफिया आणि ह्यूग औल्ड. फ्रेडला त्यांचा छोटा मुलगा टॉमीची देखभाल करायची होती. इथं फ्रेडशी चांगलं वागलं गेलं आणि त्याला खाण्यासाठी भरपूर मिळू लागले.


रोज दुपारी, मिसेज़ औल्ड, टॉमी आणि फ्रेडला बायबल वाचून दाखवत असे, फ्रेडला गोष्टी ऐकायला खूप आवडे. त्याने मिसेज़ औल्ड ला वाचायला शिकवायला सांगितले.






मिसेज़ औल्डला, फ्रेडला शिकवायला आवडे.फ्रेडला दुपारची ही शिकवणी खूप आवडत होती. त्याने लवकरच वर्णमाला शिकली. लवकरच तो कितीतरी छोट्या शब्दांचा उच्चार करायला लागला.

एक दिवस मिसेज़ औल्डने आपल्या पतीला सांगितलं की फ्रेड किती भराभर शिकत आहे. मिस्टर औल्ड ला खूप राग आला. ते म्हणाले की गुलामांना वाचायला शिकवणे हे कायद्याच्या विरोधात आहे.त्यानंतर मिसेज़ औल्डने फ्रेडला परत कधी शिकवलं नाही.






पण फ्रेडला अजूनही शिकायची इच्छा होती. त्याने स्वतः वाचन आणि लिखाण शिकण्याची एकही संधी सोडली नाही.





मार्च १८३३मध्ये फ्रेडला परत फार्मवर काम करण्यासाठी पाठवले. त्याचे नवीन मालक ह्यूग औल्ड चा भाऊ थॉमस औल्ड होते. ते नेहमीच आपल्या गुलामांना मारत असत. त्यांना फ्रेड आवडत नव्हता आणि ते त्याच्या बरोबर कठोरपणे वागत असत.






जेव्हा फ्रेड १७ वर्षाचा झाला, थॉमस औल्डने फ्रेडला एडवर्ड कोवेच्या शेतात पाठवले. कोवेने “त्रास देणाऱ्या” गुलामाला एक आज्ञाधारक गुलाम करण्याचे वचन दिले.

फ्रेड शूर होता. एक दिवस, जेव्हा कोवे त्याला मारत होता, तेव्हा फ्रेडने त्याच्याबरोबर मारामारी केली आणि त्यात तो जिंकला.

त्यानंतर, फ्रेड एक स्वतंत्र व्यक्ती होण्याचा दृढ निश्चय पहिल्यापेक्षा कितीतरी अधिक केला.

काहीवर्षा नंतर फ्रेडला परत बाल्टिमोरला पाठवले गेले. तिथं त्याने एका शिपयार्डमध्ये काम केलं. आता तो खुश होता. पण तो मुक्त होवू इच्छित होता.






एक दिवस त्याची भेट एका गोऱ्या नाविकाशी झाली.त्या नाविकाजवळ कागद होते जे सिद्ध करत होते की तो एक स्वतंत्र व्यक्ती आहे.नाविकाने फ्रेडला ते कागद आणि एक वर्दी त्यला उधार दिली, ज्यामुळे फ्रेड उत्तरेकडे जाऊ शकेल, जिथं गुलामी अवैध होती.





3 सप्टेंबर १८३८ला फ्रेंड आपल्या स्वातंत्र्यासाठी पळाला. त्याने न्यू बेडफोर्ड, मॅसॅच्युसेट्सला जाणारी एक ट्रेन पकडली. त्याने अटक होण्यापासून वाचण्यासाठी आपले नाव फ्रेडरिक बेली बदलून फ्रेडरिक डगलस केले.



न्यू बेडफोर्डमध्ये, डगलसला एका शिपायाची नोकरी मिळाली.नंतर त्याने बाल्टीमोर येथील एका स्वतंत्र काळ्या महिलेशी ॲना मरेशी लग्न केले.


डगलस गुलामगिरी विरोधी समुहात सामिल झाले, या लोकांना गुलामगिरी नष्ट करायची होती. १८४१ मध्ये फ्रेडने गुलामगिरी विरुद्ध आपले पहिले भाषण दिले.त्यांचे भाषण खूप लोकप्रिय झाले.





पुढच्या चार वर्षांमध्ये, डगलसने खूप काही केलं. त्यांनी खूप ठिकाणी भाषणं केली.त्यांनी आपल्या जीवनाविषयी एक पुस्तक लिहले.

औल्ड्स यांनी डगलसचे पुस्तक वाचले. ते खूप चिडले.त्यांना वाटत होतं की त्यांचा पळून गेलेला गुलाम परत यावा.पण डगलस, इंग्लडला निघून गेला ज्यामुळे त्याला कोणी पकडू नये.




इंग्लड मध्ये, डगलस एक लोकप्रिय वक्ता आणि लेखक झाले. तिथं त्यांना असे मित्र मिळाले की ज्यांनी ओल्ड्सकडून त्याचे स्वातंत्र खरेदी करण्यासाठी पुरेसे धन जमा केले.


दोन वर्षानंतर, डगलस संयुक्त राज्य अमेरिकेला परत आला आणि रोचेस्टर, न्यूयॉर्कला गेला. तिथं "द नॉर्थ स्टार" नावाचे एक गुलामी-विरोधी वर्तमानपत्र सुरु केले.






जेव्हा गृहयुद्ध सुरु झाले, तेव्हा डगलसने राष्ट्रपति लिंकन यांना काळ्या सैनिकांना केंद्रीय सेनेमध्ये भरती करण्यास सुचवले. लिंकन या गोष्टीशी सहमत झाले.





गृहयुद्धामुळे गुलामी समाप्त झाली. डगलसने नागरिक अधिकार आणि काळ्या लोकांचे स्वातंत्र यासाठी आपली लढाई चालू ठेवली. २० फेब्रुवारी, १८९५ला त्यांचा मृत्यू झाला.



फ्रेडरिक डगलस यांच्या शब्दांमुळे अनेक लोकांना स्वातंत्र्याच्या रस्त्यावर चालण्याची प्रेरणा मिळाली. :

“सगळ्यांसाठी स्वातंत्र."

समाप्त